सं.फौ.ख.क्र.६४९८/२०२०
चिटणविसपुरा संमीत्र वि. मो. साबीर
नि.क्र. १५ खाली.

**सरतपासणी शपथेवर सुरु**

**मी शपथेवर सत्य निवेदन करतो की,**
**माझे नाव:** अनिल मनोहरराव पोटे
**वय:** ४६ वर्षे, व्यवसाय: नोकरी,
राह.: विद्या नगर, नागपूर, जि. नागपूर.

**<u>फिर्यादीचा पुढिल सरतपास फिर्यादीतर्फे ॲड. एस.एस. ठवकर यांचे मार्फत.</u>**

१. मी दाखल केलेल्या सरतपासणीच्या शपथपत्रातील मजकूर माझे सांगणेप्रमाणे लिहिला असून तो खरा व बरोबर आहे. सदरील मजकूर मी वाचून पाहिला व माझ्या विधिज्ञांनी सुध्दा मला समजवून सांगितला. त्यावर मी माझी सही केली आहे.

२. फिर्यादी संस्थेने मला दिलेले अधिकाराबाबत संस्थेचे ठरावाची प्रत आता मला दाखवण्यात आली. त्यावर अध्यक्ष व व्यवस्थापक, चिटणवीसपुरा संमीत्र सहकारी संस्था यांच्या सहया आहेत. त्याची मुळ प्रत मी आज सोबत आणली आहे. अभिलेखावर दाखल प्रत व मुळ प्रतीतील मजकूर सारखाच आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात आले. तसेच फिर्यादी संस्थेने माझ्या हक्कात दिलेली स्पेशल पॉवर ऑफ अटर्नीची प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्याची मुळ प्रत मी आज सोबत आणली आहे. त्यावर संस्थेचे सचिव व अध्यक्ष तसेच दोन साक्षीदार आणि माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. अभिलेखावर दाखल प्रत व मुळ प्रतीतील मजकुर सारखाच आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात आले. मला आता दि.२२.०३.२०१३ रोजीचा कर्ज मागणी अर्ज दाखवण्यात आला. त्यावर आरोपी, तसेच दोन जमानतदार यांच्या सहया आहेत. सदर अर्जासोबत कार्यालयाचे प्रमाणपत्र, वारसदारांचे संमतीपत्र, दैनिक अभिकत्यार्ची शिफारस, कर्ज वसुलीचे हमीपत्र, कार्यकारी मंडळाचा निर्णय, जामीनदाराचे माहितीपत्र, सहआवेदकाने भरावयाची माहिती, कार्यालयीन माहिती, संचालक मंडळाचा ठराव, करारपत्रकाच्या अटी व शर्ती, वचनचिठ्ठी, कपातीबाबत आणि कर्ज रक्कम मिळाल्याची पावती यांचा समावेश आहे. त्यास एकत्रीतपणे **नि.क्र.२०** देण्यात आले. आरोपीने घेतलेल्या कर्जाबाबत फिर्यादी संस्थेने ठेवलेल्या आरोपीच्या कर्ज खात्याचा खाते उतारा प्रकरणात दाखल केला असून त्यावर व्यवस्थापक यांची सही व बँकेचा शिक्का आहे तसेच त्यावर वसुली अधिकारी म्हणून माझी सही आहे. त्यासोबत भारतीय पुरावा कायदयाचे कलम ६५बी चे आवश्यक असलेले प्रमाणपत्र जोडलेले असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.

कर्ज खाते उताऱ्यास **नि.क्र.२१** व त्यासोबतच्या प्रमाणपत्रास **नि.क्र.२२** देण्यात आले. आरोपीने कर्ज परतफेडीकरीता फिर्यादी संस्थेला दिलेला धनादेश आता मला दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात आले. धनादेश वटविणेकामी दाखल केला असता तो अनादरीत झाला. तसा मेमो 'फंडस इनसफिशिएंट' अशा शेऱ्यासह बँकेने दिला. तो मेमो आता मला दाखवण्यात आला. त्यावर बँकेचा शिक्का व बँक अधिकाऱ्याची सही आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात आले. आरोपीला वकिलामार्फत रक्कम मागणीची नोटीस पाठविण्यात आली. त्यावर आमचे वकिलांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात आले. आरोपीस नोटीस पाठविल्याबाबत पोस्टाची मुळ पावती प्रकरणात दाखल केली असून त्यास **नि.क्र.२६** देण्यात आले. आरोपीस नोटीस मिळाल्याबाबत पोस्टाची पोचपावती प्रकरणात दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.२७** देण्यात आले.

**सरतपास संपला.**

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत,** **माझे समक्ष,**

(आनंद सो. मुंडे)
८ वे सह दि.न्या.व.स्तर व
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर.
(परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ चे विशेष न्यायालय)

नागपूर.
दिनांकः ०७/११/२०२४

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word same as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik